पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक २४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १८/८/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उत्पन्नाचा आढावा

**विषय क्र. ५५१**

दि. ५/८/२००९ ते ११/८/२००९ अखेर आयातकर कार्यालयाचा जमा उत्पन्नाचा, रहदारी व बिगरजकात पकडलेल्या वाहनांचा व दंडात्मक कार्यवाहीबाबत मा.आयातकर प्रमुख यांचे क्र. संकलन/१७२६ दि. १३/८/२००९ ने पाठविलेला तपशील माहितीसाठी.

## घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्रं. ५५२**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पाठविलेला साप्ताहिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, घन कचरा व्यवस्थापन यांचे क्र. एसडब्ल्युएमओ/७१३ दि. १३/८/२००९ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ५५३**

मा.किरण बारटक्के व मा.किशोर शिंदे यांचे दि. १२/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी परिसरातील विविध ठिकाणी पाण्याची नविन लाईन टाकणेसाठी र.रुपये ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, मलनिःसारण प्रकल्प, पान क्र. ५८, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी विठ्ठलनगर, गोकुळनगर, अमर भारत नगर व आदर्श नगर इ.परिसरात मलवाहिनी टाकणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ११० वारजे माळवाडी परिसरातील विविध ठिकाणी पाण्याची नविन लाईन टाकणे | --- | ८ लाख |

**विषय क्र. ५५४**

मा.किरण बारटक्के व मा.किशोर शिंदे यांचे दि. १२/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११० वारजे स.नं. १०७/१०/१०८/१ओ/८नवा स.नं. १०८/१, ६/२ याठिकाणी जलतरण तलाव बांधणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-१६, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, पान क्र. २५४, अ.क्र. ११२, वॉर्ड क्र. ११० मध्ये स.नं. १३४ वरदा सोसायटी येथे विरंगुळा केंद्र बांधणे | १० लाख | --- |
| यादी क्र. एस-२, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे, पान क्र. २३१, अ.क्र. २४७, वॉर्ड क्र. ११० मध्ये संघर्षनगर, सहयोगनगर, अमर भारत सोसायटी, भागीरथीनगर संपूर्ण रस्ता विकसित करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ११० वारजे स.नं. १०७/१०/१०८/१ओ/८नवा स.नं. १०८/१, ६/२ याठिकाणी जलतरण तलाव बांधणे | --- | २०लाख |

Unregistered

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. ५५५**

दि. ६/७/२००९ ते दि. १२/७/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २३ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/२४५ दि. ७/८/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ५५६**

दि. २७/७/२००९ ते दि. २/८/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/२६९ दि. ११/८/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. ५५७**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील कोंढवा खुर्द संपर्क कार्यालयाकडील ग्रामपंचायत कोंढवा खुर्द नमुना नं. ८ अ वरुन सन १९९९–२००० मधील कोंढवा खुर्द विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/२७० दि. ५/८/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ३४ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. ५५८**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. २०८७ दि. १०/८/२००९ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. ५५९**

वॉर्ड क्र. ६० मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ करणेसाठी र.रुपये ११.२५ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.अंकुश तिडके व मा.शिवराम मेंगडे यांचे दि. २०/५/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १४५ दि. २६/५/२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.१/२७७ दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ५६०**

वॉर्ड क्र. ६० मध्ये फुटपाथ करणेसाठी र.रुपये १२.२५ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.अंकुश तिडके व मा.शिवाजी बांगर यांचे दि. २७/५/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १९१ दि. २/६/२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विकाक्र.१/२७८ दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ५६१**

वॉर्ड क्र. ६ येरवडा प्रिझम प्रेस कर्मचारी वसाहत ते टिंगरेनगर एअरपोर्टपर्यंत ६० फूटी डी.पी.रोड तयार करणेसाठी र.रुपये ६० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.सागर माळकर यांचे दि. ३/७/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ३७४ दि. २४/७/२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्र. मआ/पथ/२८० दि. १२/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ५६२**

खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्राकडील बाजूस रस्त्याचे बाजूने चौपाटी विकसित करणेसाठी रिटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडसपैकी ठेकेदार मे.पिलाणे डावरे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु १,३६,५४,२२५/– पेक्षा १५.०८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१५,९५,१९३=३५ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२७४ दि. ११/८/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ५६३**

वॉर्ड क्र. २ स.नं. ३३/२, ३४/१/२ विद्यानगर धानोरी येथील मोकळ्या जागेमध्ये उद्याने विकसित करणे, वॉचमन क्वॉर्टर बांधून विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.अदिती इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २२,४०,५२०=६८ पेक्षा २% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,९५,७१०=२७ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२७५ दि. ११/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५६४**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण अभियान योजनेअंतर्गत बोपोडी स्मशानभूमी शेजारी संरक्षक भिंत बांधणे (० ते १०० मी) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.साई यश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७४,५३,१४३/- पेक्षा २१.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५८,६३,२७५=१० अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/जनेराशपुअ/२७९ दि. १२/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५६५**

विकास अभियंता पथ (पुर्व) यांचे कार्यक्षेत्रात रस्त्याची देखभाल दुरुस्तीची व डांबरीकरणाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.सनशाईन पेव्हिंग्ज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,४९,९८,६७०/- पेक्षा २४.९४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१२,५८,००१=७० पर्यंत काम करुन घेणेस तसेच सिमेंट, स्टिल व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक ठेकेदारास अदा/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२८१ दि. १२/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५६६**

खराडी स.नं. ५८ येथे २५ लक्ष लिटर्स क्षमतेची ई.एस.आर.टाकी बांधणे व चाचणी करुन यशस्वीपणे कार्यान्वित करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.परफेक्ट इंजिनिअरींग असोसिएटस प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,९९,५४,५५१/- पेक्षा ५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २,०९,५२,२७८=५५ अधिक भाववाढ सुत्रानुसार व तारांकित दराच्या फरकानुसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/२८२ दि. १२/८/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. ५६७**

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता शांतीशिला भागात बांधणेत आलेल्या विरंगुळा केंद्र क्षेत्रफळ २१७.८७ चौ.मी. भाडे तत्वावर चालविण्यास देणेबाबत निविदा मागवली असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाचे अपेक्षित मासिक भाडे र.रुपये ९,०१४/- पेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे रक्कम देऊ करणारे ठेकेदार आमदार विनायक निम्हण मित्र मंडळ, ग्रीन पार्क हॉटेलजवळ, बाणेर रोड, पुणे ८ यांचे मासिक भाडे र.रुपये ९,१००/- स्विकारुन ताबा दिनांकापासून त्यांना ५ वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरिता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/१९२ दि. ८/७/२००९ चे पत्र.

(टिप :- अ.क्र. १ व ३ या ठेकेदारांनी देऊ केलेल्या रकमा समान होत्या परंतू क्र. ३ च्या ठेकेदाराने निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये विसंगती असल्याने त्यांची निविदा टेंडर सेल विभागामार्फत अपात्र ठरविण्यात आली आहे.)

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ४/८/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

UnRegistered

## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १८/८/२००९

**विषय क्रं. ५६८**

मा.अशोक येनपुरे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. १७/८/२००९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील मा.पदाधिकारी यांना आपल्या पुणे मनपातर्फे आयडीयाचे सिमकार्ड देण्यात आलेले आहेत. परंतू काही मा.पदाधिकारी पुर्वीचेच व्होडाफोनचे सिमकार्डचा वापर करीतआहेत.

तरी जे मा.पदाधिकारी आयडीयाचे ऐवजी व्होडाफोन अथवा अन्य कंपन्यांचे सिमकार्डचा वापर करीत आहेत त्यांचे बिल पुणे महानगरपालिकेतर्फे अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. ५६९**

मा.अशोक येनपुरे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. १७/८/२००९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेवकांप्रमाणेच शिक्षण मंडळ व परिवहन महामंडळाकडील विद्यमान नगरसेवकांना वैद्यकिय सुविधेचा लाभ देण्यात येतो. या वैद्यकिय सुविधेचा लाभ माजी नगरसेवकांना उपलब्ध व्हावा म्हणून मा.स्थायी समिती ठराव क्र. १३४० दि. ११/११/२००८ व मा.मुख्य सभा ठराव क्र. ३७२ दि. २४/११/२००८ ने मान्यता दिलेली आहे.

त्याचप्रमाणे पी.एम.टी. व शिक्षण मंडळाकडील सर्व माजी सभासदांना वैद्यकिय सुविधेचा लाभ उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी.

Unregistered

**विषय क्रं. ५७०**

मा.शंकरराव बेलदरेपाटील व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. १७/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १४४ मधील स्मशानभूमी मध्ये बर्निंग शेड, वेटींग शेड व घाट बांधणेकरिता र.रुपये ३० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, पान क्र. १२६, अ.क्रं. ८, ५–लोकारोग्य, नव्याने समाविष्ट झालेल्या ३८ गावातील स्मशानभूमीत सुधारणा काम करणे, एकूण तरतूद रुपये ३.७५ कोटी | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १४४ मधील स्मशानभूमी मध्ये बर्निंग शेड, वेटींग शेड व घाट बांधणे | --- | ३० लाख |

**विषय क्रं. ५७१**

मा.अनिल जाधव व मा.सुनिल बिबवे यांचे दि. १४/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ११५ मधील स.नं. ९३ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणे कामी र.रुपये २३ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९– २०१० चे अंदाजपत्रक, क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणाअंतर्गत करावयाची कामे, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय, डी.सी.एन.टी. ९–३३/३६, तुळशीबागवाले कॉलनीतील विविध रस्ते डांबरीकरण करणे | २३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ११५ मधील स.नं. ९३ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणे | --- | २३ लाख |

**विषय क्रं. ५७२**

मा.हनिफ शेख व मा.बाबु वागसकर यांचे दि. १८/८/२००९ चे पत्र

मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांच्या ऐच्छिक खर्चासाठी र.रुपये ५० हजाराचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक अ, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे, क.महानगरपालिका व स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, ३.संकिर्ण | ५० हजार | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १८. मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांचा ऐच्छिक खर्च | --- | ५० हजार |

**विषय क्रं. ५७३**

मा.निलेश निकम, अध्यक्ष-स्थायी समिती यांचे दि. १८/८/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ५३ पत्रकारनगर, बारामती होस्टेल रस्ता फुटपाथ करणे व सुशोभित करणे या चालू कामासाठी कमी पडणारी तरतूदीसाठी र.रुपये १७ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००९- २०१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४८, अ.क्र. २६९, सन २००८-०९ मध्ये सुचविण्यात आलेली कामे परंतू दि. ३१ मार्च २००९ नंतर खर्च पडत असल्याने सूचविण्यात आलेली कामे, (यादी क्र. झेड १), पान क्र. २६५, अ.क्र. ४२, वॉर्ड क्र. ५३ येथे विविध ठिकाणी रस्ते करणे (एकूण तरतूद रुपये ५६.२५ लाख) | १७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ५३ पत्रकारनगर, बारामती होस्टेल रस्ता फुटपाथ करणे व सुशोभित करणे या चालू कामासाठी कमी पडणारी तरतूद | --- | १७ लाख |

**विषय क्रं. ५७४**

मा.अशोक येनपुरे व मा.बाबु वागसकर यांचे दि. १७/८/२००९ चे फेरविचाराचे पत्र

स्थायी समिती ठराव क्र. ५२१ दि. १४/८/२००९ चा फेरविचार (पे अॅण्ड पार्क योजनेच्या तकत्यातील अ.क्र. २ आणि ६ चे टेंडर मागवण्याबाबत) करण्यात यावा.

**विषय क्रं. ५७५**

मा.नगरसचिव यांचे क्र. २१९९ दि. १७/८/२००९ चे पत्र.

आगामी गणेशोत्सव,विधानसभा निवडणूक तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शहरात विविध ठिकाणी व्हिडिओ कॅमेरे बसविणेकरिता पोलिस विभागास व्हिडिओ कॅमेरे खरेदीसाठी सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील महापौर विकास निधीतून र.रू.पांच लाखाचा धनादेश देण्यात आला असून सदरच्या खर्चास पश्चात मान्यता द्यावी.

**विषय क्रं. ५७६**

पुणे मनपाच्या विद्युत विभागासाठी २ X २४ वॅट टी - ५ स्ट्रीट लाईट फिटींग ५० % वाढीव परिमाणाने मे. विनवॉक सिस्टिमस् आयएनसी,नाशिक यांचेकडून रूपये १९७५/- प्रती नग याप्रमाणे १५०० नगासाठी र.रू.२९,६२,५००/- (सर्वकरांसह) खरेदी करणेस व खरेदीपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि)यांचे क्र. मआ/उआ/तांत्रिक/२३९ दि. ३/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५७७**

वॉ.क्र.६० मध्ये परमहंस नगर याठिकाणी विद्युत केबल अंडरग्राऊंड करणेसाठी र.रु.२५ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.अंकुश तिडके व मा.सचिन भगत यांचे दि. १४/५/२००९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७ दि. १९/५/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/२८५ दि. १४/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ५७८**

वॉर्ड क्र. ५६ मध्ये पाणीपुरवठ्यात सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.रोशन एंटरप्रायझेस (श्री.गौतम पांडुरंग जाधव) यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु २४,९७,७६०/- पेक्षा १३.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,६६,३०७=२५ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/२९४ दि. १७/८/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ५७९**

पुणे महानगरपालिकेच्या डॉ.नायडू रुग्णालय येथे स्वाइन फ्लु या रोगाने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी मा.महा.आयुक्त यांचे पत्रात नमूद केलेल्या तकत्यातील अ.क्र. १ ते १२ प्रमाणे औषधे व इतर साहित्य आवश्यकतेनुसार र.रुपये ४१,५४,२००/– पर्यंत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) अन्वये खरेदी करिता करार करणेस व बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/आरोग्य/२९७ दि. १८/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८०**

वॉर्ड क्रं.११२ मधील स.नं.११ कर्वेनगर येथील पोहण्याचे तलाव बांधण्यासाठी कमी पडणारी रक्कम र.रुपये २६ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.शिवराम मेंगडे यांचे दि. १७/७/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. ४१९ दि. २८/७/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/२९९ दि. १८/८/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ५८१**

वॉर्ड क्रं. ११६ मध्ये शाळा बांधणेसाठी र.रुपये ३०.६५ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २३/६/२००९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३११ दि. २३/६/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/३०० दि. १८/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८२**

कै.गेनुबाई खेसे बरमाशेल इंदिरानगर येथे वरील मजल्यावर दोन वर्गखोल्या व जिना बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.आदिती इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १७,९५,२६१/– पेक्षा १०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १६,१५,७३४=९० पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/३०२ दि. १८/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८३**

वॉर्ड क्र. १ भैरवनगर येथील शाळा क्र. १०१ येथे वर्गखोल्या बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.सोहम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,८९२=५० पेक्षा १६.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २०,८३,४१०=४१ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/३०३ दि. १८/८/२००९ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. ५८४**

सहकारनगर व बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत विविध रस्त्यांवर पावसाळ्यापुर्वी लिक्विड सिलकोट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.राधाकृष्ण बिल्ड कॉम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,१००/– पेक्षा ०.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,८५,३५४=९५ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३०४ दि. १८/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८५**

लष्कर पाणी पुरवठा केंद्राचे कक्षेतील व्हॉल्व्ह सोड–बंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.एस.के.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,३७,०००/– पेक्षा ०.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४४,३२,५६३/– पर्यंतचे काम करुन घेणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/३०७ दि. १८/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८६**

वॉर्ड क्र. १४० कोंढवा बुा भागात विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार श्री.एच.आर.पटेल यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४७,४९,०३२/- पेक्षा १४.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४०,४१,९०१=१४ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/पापु/२९५ दि. १७/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८७**

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांकडील विद्यार्थी व विद्यार्थीनीना गणवेश कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या पाचही ॲटमची मिळून एकूण र.रुपये २६,२३,९५०/- (सर्व करांसह) पुरविणेकामी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) अन्वये खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ/तांत्रिक/२९२ दि. १७/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८८**

वॉर्ड क्र. १२३ यु.बी.एस. ते चर्च रोड अद्ययावत जॉगिंग ट्रॅक पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार श्री.सुनिल आप्पासाहेब मुराबटे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,८८०/- पेक्षा ३०.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,९३,९१६=३६ पर्यंतचे काम करुन घेणेसाठी यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/२९३ दि. १७/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५८९**

वॉर्ड क्र. ११६ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेटमधील शिवदर्शन फा.प्लॉट ४७८ येथील जागेत शाळा बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडसपैकी ठेकेदार मे.पंडित लक्ष्मण उंदरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३,९९,८३,०५५/- पेक्षा १५.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून पुर्वगणित र.रुपये ४,००,००,०००/- पर्यंत अधिक विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन काम करुन घेणेसाठी यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/भवन/२८४ दि. १४/८/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ५९०**

ससून हॉस्पिटल व बी.जे.मेडिकल कॉलेजमधून बेवारस प्रेते व अवशेषांची वाहतुक करणाऱ्या आरोग्य खात्याकडील जास्तीत जास्त ९ बिगारी सेवक व एक ड्रायव्हर सेवकांपैकी जे सेवक कामावर उपस्थित राहून प्रत्यक्ष ज्या दिवशी किमान २ बेवारस प्रेते किंवा ५ ड्रम्स उचलण्याचे काम करतील अशा सेवकांना प्रत्येकी र.रुपये ३००/- प्रतिदिन या दराप्रमाणे मार्च २००९ पासून मुशाहिरा देणेस तसेच ज्या दिवशी प्रेते उचलण्याचे काम केलेले नसेल त्या दिवशी हा मुशाहिरा देण्यात येणार नाही याबाबत आवश्यक ती दक्षता खात्याकडून घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/आरोग्य/२९८ दि. १८/८/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

UnRegistered